# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नेहरू नगर झोन क्र. 5 अंतर्गत प्रभाग क्र. 28 मधील बौध्द विहार रिंग रोड ते सेनापती नगर उमरेड रोड येथे मुख्य मलवाहिनी टाकणे व चेंबरच्या बांधकाम करण्याच्या कामास्तव मुळ प्राकलनिय रक्कम रू. 25,90,557/- आहे. कामास पद क्र. A23925130863 अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2023-24 मध्ये रु. 25,90,557/- चे प्रावधान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. करीता सदरहू प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच रितसर निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**{सा.बां.वि. झोन क्र. ०५}**

टिप :-

1. सदरहू कामाला कार्यकारी अभियंता यांच्याव्दारे तांत्रीक मान्यता क्र. EE/Z-5/PWD/T.S/ 76/ 23-24 दि. 11/10/2023 नुसार रु. 21,56,588/- च्या राशीला तांत्रीक मान्यता प्राप्त आहे.
2. सदर कामाचे खर्चास्तव प्रावधान आय व्यय पद. क्र. (A23925130863) मध्ये प्रावधान उपलब्ध आहे.
3. इतर सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 632/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 02/12/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नेहरुनगर झोन क्र. ०५ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नेहरू नगर झोन क्र. 5 अंतर्गत प्रभाग क्र. 28 मधील बौध्द विहार रिंग रोड ते सेनापती नगर उमरेड रोड येथे मुख्य मलवाहिनी टाकणे व चेंबरच्या बांधकाम करण्याच्या कामास्तव मुळ प्राकलनिय रक्कम रू. 25,90,557/- आहे. कामास पद क्र. A23925130863 अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2023-24 मध्ये रु. 25,90,557/- चे प्रावधान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. करीता सदरहू प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच रितसर निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**